# म्हैसूरचा वाघ

**हरि नारायण आपटे**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**म्हैसूरचा वाघ : हरि नारायण आपटे**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

# १ : अंदोनीच्या मैदानात

इ. स. १७८० साली जून महिना लागून थोडे दिवस झाले होते. दिवसा अतिशय उकाडा होऊन आता पावसाळ्याला पाच चार दिवसात प्रारंभ होणार म्हणून तो सुचवू लागला होता. या संधीत एक दिवस अस्तमानाच्या सुमारास अंदोनीच्या किल्ल्याच्या दक्षिणेस जे एक मोठे थोरले मैदान आहे. त्यातून काही मंडळी रेंगाळत व रखडत चालली होती. त्या सर्व मैदानभर लोण्याप्रमाणे मऊ अशी काळी चिकण जमीन होती, असे सांगितले म्हणजे ती मंडळी रेंगाळत व रखडत चालली होती असे का म्हटलें याचे कारण कोणासही समजणार आहे.

सगळ्यांच्या पुढे एक गृहस्थ चालला होता. तो वयाने चांगला पन्नाशीच्या जवळ असला पाहिजे. तो एका मोठ्या थोरल्या पाणीदार अशा दक्षिणी घोड्यावर स्वार झालेला होता. हा घोडा पाणीदार होता असे म्हटलं आहे खरें, पण आता त्याच्या चेहऱ्यावरचें पाणी सगळे नाहीसें झालेलें होते आणि तसें होईल यात नवले ते काय? दुपारी बारा वाजल्याच्या आधींपासून तो बिचारा त्या चिखलातून पुढे चालला होता. चिखलांतून चालण्याचे श्रम म्हणजे काय असतात हे काही वर्णन करून कधीच सांगता यावयाचे नाही. तो घोडा तर अगदी थकून जाऊन कसा तरी नाइलाजास्तव चालला आहे व प्रत्येक पाऊल उचलून टाकताना त्याला जास्त जास्त थकवा चढत चालला आहे हे अगदी स्पष्ट दिसूं लागले होते. त्याचे पाय गुडघ्याच्या वरपर्यंत चिखलाने भरलेले होते. तरी जनावर शहाणें असल्यामुळे त्याने आपल्याकडून हजारो ठिकाणीं चिखल टाळला. वर स्वार झालेल्या गृहस्थाच्या अंगावर तर चिखल किती उडाला होता हे काही सांगताच येत नाही.

तो स्वार झालेला गृहस्थ पन्नाशीच्या जवळजवळ असावा असे आता वर सांगितलेच आहे. त्याचे तोंड व डोके आपल्या मलमलीच्या दुपेट्याने अगदी वेष्टून टाकिले होते.

दुपारचे ते विलक्षण ऊन आणखी मधूनमधून येणाऱ्या झळया बाधू नयेत म्हणून हा बंदोबस्त केला होता, तरी पण त्यातल्या त्यात त्याच्या चेहऱ्याचा जो भाग दिसत होता. त्यावरून त्याचा वर्ण काळा असून चेहऱ्यावर देवीने ठिकठिकाणी बरीचशी खोल टाकी मारली असावी असे स्पष्ट दिसत होते; पण त्याचे डोळे अतिशय मोठे असून अगदी काळेभोर होते आणि त्याचे जे तेज होते ते काही विचारूच नका. एखाद्या ठिकाणी घोडा अडखळला असता, संतापून लगामीला किंचित हिसका देताना अगर त्या खडतर चिखलवट रस्त्याला रस्ता हे नाव तरी त्या वाटेला शोभेल का नाही कोणास ठाऊक! चार दोन शिव्या हासडतांना त्याच्या डोळ्यात जे तेज चमके ते तर काही विलक्षणचं होते. त्याचा पोशाख भरगच्च किनखापाचा होता; पण अगदी जुना झाला होता. नवेपणी तो फार उमदा दिसत असेल यात शंका नाही. पण आता तो इतका मळून विटून गेला होता की, काही तर मानाची व पदवीची खूण म्हणूनच त्याने तो घातला असावा असे स्पष्ट दिसत होते. ज्या ज्या खेड्यापाड्यातून त्याला जायचें होते, त्यांनी त्यांनी पाहताचं हा कोणी तरी उमराव आहे असे वाटून आपला मानमरातब राखावा एवढाच काय तो हेतू! पैसा जरी कितीही असला तरी अधिकाराची गोष्ट निराळीच असते. छातीवरचे बंध बांधलेले नव्हते. तो भाग मोकळाच होता आत एक अतिशय पातळ असा मलमलीचा सदरा मात्र होता व त्यातून दिसणारी छाती हा जवान बडा सशक्त आहे असे स्पष्ट दाखवीत होती. एक अतिशय सुंदर शाल त्याच्या कमरेला गुंडाळलेली होती. इजार पोकळ असून इराणी चढाऊ जोडे वरपर्यंत चढविलेले होते. खांद्यावर एक जरीचा पट्टा होता. त्यालाच एक तलवार अडकविली होती. पण खरोखर ती तलवार कमरेला गुंडाळलेल्या शालीने कमरेला आवळून टाकलेली होती. तिचा विशेष उपयोग शोभा हाच होता असे दिसते. खोगिराच्या उजव्या बाजूला एक परशु (कुऱ्हाड) लहान पण फार पाणीदार अशी चमकत होती व डाव्या बाजूला उत्तम रुप्याच्या फुल्या वगैरे ज्यावर खूप बसविल्या आहेत, अशा एक पिस्तुलाची मूठ दिसत होती. एक फार किमतीची ढाल त्याच्या पाठीला बांधली होती.

एकंदरीत एवढे खरे की, अबदुल रहिमानखान त्या मैदानातून चालला असताना विलक्षण दिसत असून त्याच्या पाठीमागून चालणाऱ्या लोकांचे रक्षण करायला तो एकटा पुरा आहे असे वाटत असे. पण त्या मंडळीत तो एकटाच हत्यारबंद नव्हता. आणखी पाचसहा मंडळी त्याच्याप्रमाणेच हत्यारबंद अशी दिसत होती. ते सर्व लोक त्याचेच नोकर होते. त्यांचे घोडे किंवा त्यांचे पोशाख खानासारखे नव्हते हे उघडच

आहे. पण ते एकंदरीत त्याच्यासारखेच शूर दिसत होते आणि खानासुद्धा ते लोक जर एकदम एकाच ठिकाणी चालते तर तो देखावा मोठा भव्य दिसला असता.

त्या घोडेस्वारांपासून पाठीमागे काही अंतरावर एक पालखी चालली होती. ती पालखी बरीच जड असावी असेही दिसत होते. कारण थोडे नाही, थोडके नाही, सोळा भोई असून ते वरचेवर खांदे बदलीत होते. त्या चिखलातून रपारप पाय जात ते उचलून पालखी सांभाळून चालल्याने तर त्यांचा जीव अगदी मट्‍ट्यास आला होता असे दिसले. पाऊल टाकण्याचा अवकाश की गुडघ्यापर्यंत चिखलात रुतलेच! जे पालखीला लागले नव्हते, त्यांनी आपल्याकडून पालखीवाल्यास उत्तेजन यावे म्हणून खटपट चालविली होती; पण तिचा काही तादृश उपयोग झाला नाही. ते बिचारे अगदी थकून गळून गेले होते. आता वास्तविक एक पाऊलदेखील टाकवत नव्हते हे तर उघड दिसत होते, पण करतात काय बिचारे! चालले होते तसेच रखडत!

सगळ्यांच्या पाठीमागे पाच उंटांची एक रांग चालली होती. आधी ते खूप लादलेले होते, त्यात हा असा चिखल. मग काय विचारता! त्या हाकणारांची पण नुसती त्रेधा उडत होती. त्यांना सांभाळण्यासाठी न जाणो केव्हा पाय घसरेल आणि केव्हा जनावर बसेल! त्या उंटांच्याच बरोबर काही लोक डोक्यावर ओझी घेऊन चालले होते व काही लहान लहान तट्टावर बसून चालले होते. ही खानाची नोकरमंडळी होती, हे उघडच दिसत होते. अस्तमान होऊन काळोख तर क्षणोक्षणी वाढत होता. मंडळी आपापल्याकडून लवकर पाऊल उचलण्यास आपल्या सोबत्यांस व जनावरांस उत्तेजन देतच होती. याही मंडळींच्या पाठीमागे दोन खाजदार दोन फारच सुंदर व उमदे असे घोडे धरून जेथे सगळ्यात कठीणशी जागा असेल अशाच जागेवरून त्या घोड्यास ते घेऊन चालले होते. अशी एकंदर मंडळी होती.

आतापर्यंत या मंडळींचे एकंदर बाह्य वर्णन झाले; परंतु ही मंडळी कोण व कोठून कोठे चालली होती, हे समजण्यास त्यांचे एकमेकांत संभाषण चालले असेल तेच ऐकिल्याखेरीज काही मार्ग दिसत नाही. तेव्हा ती माहिती मिळवू इच्छिणाऱ्या आमच्या वाचकांनी त्याच मार्गाचा स्वीकार करावा हे बरें. तो पहा. तो खानसाहेबांचा सैपाक्या काही बोलतो आहे तेच आपण आता ऐंकू या.

''अल्ला! अल्ला! एका खूप बळकट अशा तट्टावर बसलेला खानसाहेबांचा सैपाक्या ओरडतो, मी झुलफिकर अशा या पावसाळ्या दिवसात हैदराबाद सोडावयाचा नाही तो कुठून असा आलो पहा! थूः तिच्या ओमौलालि खुदावंद! केव्हा काढशील आम्हांला

या चिखलातून ते खरें! आता आणखी त्यांत पल्ला दूरचा म्हणजे मग मध्यरात्र काही उलटायला नको. आमची इथल्या इथेच गच्छंती होणार. छे, असा प्रवास दोन दिवस जर करावा लागला तर आमच्या जगण्याचे नाव कशाला? सगळ्या दुनियेतला चिखल येऊन आमच्या वाटेवर पडला आहे. कायरे दाऊदखान, या जन्मात आपण पुढल्या मुक्कामाला जाऊं असं तुला वाटता का रे? नकोत बाबा ह्या नरकयातना! जिवंतपणी नरकवास हां! अहो गबरू! बोला! तुम्ही म्हणाला होताना, आम्हालां आहे हा सगळा मुलूख ठाऊक म्हणून?

''अरे हो, आहेच मला ठाऊक. भित्री भागुबाई कुठली! लेका, असे आमच्या कपाळाशी रडून काय उपयोग आहे? खानसाहेबांनी मोठी मेहरबानगी करून तुला असा चांगला फक्कड तट्टू बसायला दिला आहे अन् रडतोस का लेका? पैगंबराच्या कृपेने हा खडतर रस्ता लवकरच संपेल. अंदोनीच्या किल्ल्यात मुक्काम करायचा नाही असा जर खानसाहेबांना हुकूम नसता तर तिथेच नसता का आपण मोठ्या आनंदात तळ दिला? पण नाही. त्यांची जर मर्जी नाही अन् खुद्द बिबीसाहेबांनी देखील जर पुढेच चला, काही हरकत नाही, असं म्हटलं तर मग काय, आपण हट्ट करायचा होता काय? लेका, त्यांचा निमक खाऊन नोकरीच्या वेळी अशी कुरकूर! जर पुनः एक शब्द काढलास तर खबरदार! तुझं रडगाणं ऐकायचं आम्ही, का आपल्या रस्त्याकडे लक्ष द्यायचं?'' ''मी आपला मुकाट्यानं बसतो कसा!'' झुल्फिकर उत्तर करतो. ''पण काही म्हणा तुम्ही, माझं मन आपलं कचरून जाऊन मला सांगते की, आपण आज काही कोणच्या देखील मुक्कामाला सुरक्षितपणानं जात नाही. फारच झालं तर एखादं खेडं लागेल. तिथे उतरतील, तिथे काही मांस मिळायचं नाही. कोंबडी मिळायची नाहीत. डाळरोटी नाही तर चावल मिळाले म्हणजे मोठी मिळविली! इतके थकून शेवटी खायला हे, मग तर झालं!''

''हात लेका झुल्प्या, तुझ्यासारखा भित्रा आजपर्यंत मी कुठें पाहिला नाही.'' दुसरा एक माणूस ओरडून म्हणती, ''तू शिपाई गडी असतास, तर तुझ्या तोंडून अशी अक्षरे निघतीना! अरे, दोन दिवस उपास काढायला पडून शेवटी एखादा भाकरीचा तुकडा नाही तर मूठभर भात मिळाला म्हणजे खुदाची मोठी खैर म्हणावयाची. असा प्रसंग जर तुझ्यावर आला तर तुझं व्हावं कसं! क्यो वे, तुझं व्हावं कसं?''

''माफ कर! माफ कर! नासर, एक शब्ददेखील आता काढू नकोस. आता तू बोलला एवढ्यानंच माझी त्रेधा उडली आहे बोवा! आताच माझे प्राण व्याकुळ झाले

आहेत. अन् तुमची ही अशी बोलणी ऐकून तर माझ्या पोटात भूकेनं काहूरच केलं. एक रोट्यांची चळत सकाळीच करून बांधून घेतली असती तर! मला बाबा उपास म्हटला की अंगावर काटा उभा राहतो! मी रमझानचा देखील उपास कधी पुरता तडीस नेला नाही. कोणाला तरी पैसे देऊन माझ्यासाठी करायला सांगतो. परवरदिगार मला याबद्दल माफ करो म्हणजे झालं! आता अल्लापाशी एवढेंच मी मागतो, की त्यानं खानसाहेबांना कुठे तरी लवकरच रातच्या रात मुक्काम करण्याची बुद्धी द्यावी. या अल्ला! या खुदा! क्या यह पेटका हो गया देखो!''

हे यांचे बोलणे चालले असताना पुढे चाललेले खानसाहेब मध्येच उभे राहिले. अंधार तर क्षणोक्षणी अधिकाधिक वाढत चालला. सूर्य अस्ताला जाऊन बराच वेळ झाला होता. त्याचे किरण मात्र अजून उगीच कुठं तुरळक ढगांत दिसत होते. प्रकाश असा काही आता म्हणण्याजोगा राहिला नव्हता. वरच समोरच्या बाजूला एकदोन अगदी काळेकुट्ट ढग मधून मधून विजांच्या प्रकाशानं डोळे दिपवून टाकीत होते. अशी एकंदर स्थिती पाहून मोठ्या धीराचा माणूस असला तरी पुढे जावें की नाही अशी शंका येऊन मन जरा कचरून त्याने क्षणभर उभे रहावे हे अगदी साहजिक आहे. त्यातून रस्ता जर चांगला कोरडा व सरळ असता, तर त्याला काही दिक्कत वाटतो ना, पण पुढे रस्ता पहिल्यापेक्षा जास्त खांचाखळग्याचा असून चिखल म्हणजे कमालीचा दिसू लागला. पुढे रस्ता कसा काय आहे, कसेकसे गेले असतां घोड्यासं काही तरी सोपे जाईल हे पाहण्यास थोडा पुढं पाठविलेला माणूस स्वतःच जेव्हा धडपड करतो आहे, असे त्याने पाहिले तेव्हा तर त्यास विशेषच काळजी पडली. वर सांगितल्याप्रमाणे क्षणभर उभा राहून खान आपल्याशीच म्हणतो, माझ्यासारखा गाढव या दुनियेत दुसरा कोणी सापडणार नाही! मी गाढवाच्या लेकानं अंदोनीचा किल्ला टाकून पुढं यावं कशाला? बरं चला, आता त्याच्याबद्दल रडून काय उपयोग आहे? मोत्या, तुझे मात्र फारच गड्या हाल झाले. तुझ्या अंगात आता काही धमक राहिली नाही. हो! हो! बच्चा, आतां तुझ्यानं थोडसं तरी पुढे कसं जाववेल? असे बोलून त्याने आपल्या त्या घोड्याच्या मानेवर हळूहळू थोपटले.

त्या उमद्या जनावराला त्याचें ते बोलणे जणू काय समजलेच. त्यानें एक अगदी हलकेच पण चमत्कारिक शब्द काढून वर आपल्या धन्याकडे तोंड केले व पुनः तोंड फिरवून तो मोठ्याने खिंकाळला व मान लांब करून दूर पाहू लागला. ''मोत्या, तुला काही दिसत नाहीना! नाहीच बाबा, आसपास कुठ्ठे खेडंपाडं दिसत नाही. पण माझी

खात्री आहे की, जवळच कुठे तरी एखादं खेडं असलं पाहिजे. तिथल्या लोकांनी आपल्याला आतं येऊ दिलं तर आसरा मिळून अन्नपाणी मिळेल. काय रे इब्राहिम (आपल्या मागून येणाऱ्या एका स्वाराला हाक मारून) जवळपास कुठे तरी खेडं असलं पाहिजे असं वाटत नाही तुला?''

''अल्ला जाने! मी तर आजन्मांत या रस्त्यानं काय तो एकदाचं गेलो होतो. अन् त्याला किती वर्षे झाली पण! तेव्हा मी फौजेबरोबर होतो. अन् तेव्हा रस्ता कसान् काय लक्ष दिलं कोणी?''

''बराबर बेटा! पण आज तेच चांगलंच लक्ष देण्याची पाळी आली आहे ना! महंमद रसूलिल्ला! ते पाहिलेस ढग! त्याचं मला मोठं भय वाटतं. मोठी काळजी काय ती बिबीसाहेबांसाठी. तिला या अशा भयंकर प्रवासाची मुळीच सवय नाही. पण आता ती शिपाईगड्याची बायको झाली आहे तेव्हा अशाही प्रसंगाची सवय झाली पाहिजे.''

''पालखी आता येईल आपल्याजवळ अन् खुदावत, मला वाटतं त्या भोई लोकांना हा रस्ता चांगला माहीत आहे.'' दुसरा एक घोडेस्वार म्हणतो.

''खरंच हे नव्हतं माझ्या लक्षात. ती मंडळी इथे आली म्हणजे मला वाटतं एक क्षणभर विश्रांती घ्यावी अन् मग त्यांच्या विचारानं पुढंच मार्ग धरावा.''

इतके बोलणे होतं आहे तो पालखीवाली मंडळी जवळ येऊन ठेपलीच. खानसाहेबांनी त्यांना ताबडतोब रस्त्यासंबंधी दोन चार प्रश्न केले. पुढचे खेडे किती लांब आहे? केवढे आहे? किती मंडळींची सोय होण्याजोगी आहे? रस्ता कसा काय आहे?

हे शब्द ऐकून भोयांचा नाईक म्हणतो, ''हजरत, हा रस्ता इतका वाईट असेल असे आमच्या मनातदेखील आले नाही. ते जर आम्हाला ठाऊक असते तर अंदोनी गाव सोडून पुढे चालण्याला आम्ही आपल्याला सल्ला कधीच दिला नसता. पण आता काय उपयोग? आता आपल्याला या अडचणीतून निभावून नेलचं पाहिजे. मागे परतण्याचं तर नावदेखील काढायला नको! जिथें परत जाऊन आपल्याला तळ देऊन राहता येईल असे एकदेखील खेडे नाही हे आपल्याला ठाऊक आहेच. पुढे आहेत दोन खेडी, एक तर ही झाडे दिसताहेत तिथेच आहे. अन् दुसरं तेथून दीड कोसावर आहे. बिबीसाहेबांनी आणखी थोडा वेळ जर कळ काढली तर आम्ही आता तिथं हां हां म्हणता जाऊ. तिथे मोठा बाजार आहे. सगळ्या सोयी आहेत तिथे. खाविंदानी बक्षीस मात्र दिलं पाहिजे गरिबाला तिथे गेल्याबरोबर!''

‘‘अलबत! अलबत!’’ खानसाहेब म्हणतात, ‘‘दोन बकरी तुम्हाला बक्षीस देईन! अन् शिवाय उद्याचा मुक्काम तिथून अगदी जवळच करू. कारण आज तुम्ही फारच थकला आहां.’’ इतके त्या भोयांच्या नाईकास बोलून खानसाहेब आपल्या पत्नीस म्हणतात, ‘‘मेरी जान! थोडेसे पुढें गेले तर खाणेपिणे घरदार यांची चांगली सोय होणार आहे. इथेच राहिलो तर काही मिळायचं नाही अन् पावसात भिजावं लागेल. मग कसा काय आपला विचार? शिपाईगड्याशी शादी करण्यात काय सुख आहे, ते पाहिलं ना?’’

पालखीच्या आतून ‘‘माझ्याबद्दल आपल्याला बिलकुल काळजी नको. आपला जो विचार तोच माझा’’ असे मंजुळ स्वराने उच्चारलेले शब्द ऐकू आले.

‘‘ठीक आहे तर मग. कसं काय रे गोपाळ? तुझं काय म्हणणं आहे? ’’ ‘‘हुजूर, क्षणभर विसांवा खाऊन आम्हालां जरा तंबाखू ओढू द्यावी. अन् मग आम्ही हां म्हणतां आपल्याला त्या थोरल्या खेड्याला पोचवतो.’’

‘‘अच्छा! अच्छा! पण फार देर लावतां कामा नये हो! थोडासा विसांवा घेतल्याने ठीक होईल हे तर खरंच.’’

हा हुकूम होताचं मग काय विचारता? साऱ्यांनाच मोठा आनंद झाला. घोड्यावरुन उतरून सगळी मंडळी एक ठिकाणी जमली. आगटी पेटवली व कोणी आपली गुडगुडी, कोणी नैचा, कोणी चिलीम व कोणी नुसतेच चुट्टे काढले. तंबाखू म्हणजे कामकरी लोकांस एक संजीवनीच आहे असे वाटते. खूपसे श्रम झाल्यावर चार तंबाखूचे झुरके मारले म्हणजे सगळा थकवा नाहीसा होऊन माणूस पुनः ताजातवाना होतो, असा आपला त्यांचा समज आहे. आणि सवयींमुळे तसे होते हे ही खरं. असो; गुडगुड्याचा गुडगुड शब्द चाललाच होता, चुट्टे ओढणारांचे झुरकेही चालले होते. कोणी शेकोटीशी शेकतच होते. याप्रमाणे दहा वीस मिनिटे काढल्यावर मंडळी पुनः ताजी तवानी झाली व पुनः आपल्या कमरा बांधून व जातीप्रमाणे ज्यांनी त्यांनी आपापल्या देवाचे नाव घेऊन पुढे मार्गक्रमणास सुरुवात केली.

परंतु आकाशाकडे इतका वेळ कोणाचेही लक्ष गेले नाही. पूर्वी एकच ढग त्याच्या नजरेसमोर दिसत होता; परंतु आता क्षणोक्षणी नवे नवे ढग येऊन आकाशाचा रंग बदलत चालला आहे. पाऊस पडण्याची काय परंतु वादळ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत हे कोणाच्याच लक्षात आलं नाही. वीज चमकू लागल्या क्षणोक्षणी त्यांची चमक अधिकाधिक सजेत दिसूं लागली. इतका वेळ वीज चमकत होती ती

एकाच ठिकाणी होती; परंतु आता सर्व आकाशभर त्यांचा चमचमाट होऊ लागला. क्षणभरही त्यांना विसावा नाही अशी सगळी स्थिती असताही आमची प्रवासी मंडळी आपाल मार्ग काढीत चाललीच होती.

''या अल्ला! ही आजची रात्र म्हणजे भयंकर होणार! खान आपली टापशी नीट बांधीत बांधीत आपल्याशीच म्हणतो. हे शब्द बोलताना आपल्या समोरच्या सूर्यप्रकाशाने तांबडा दिसतो अशा एका ढगाकडे पाहून त्याने उसासा टाकला. एखाद्या नवख्या अजाण माणसाला तो ढग संध्याकाळच्या ढगासारखाच वाटणे हे अगदी साहजिक. परंतु नीट लक्ष लावून पाहिल्यानंतर खरोखर तो ढग काय दर्शविणारा आहे हे समजून मन चरकल्याखेरीज राहिले नसते.

खान याप्रमाणे त्या ढगाकडे पाहून विचार करीत असता दाऊदखान त्याच्या पाठीमागे आला व त्याला म्हणतो, ''सरकार, मला पक्के ठाऊक आहे की ही इथे झाडे दिसताहेत त्यातं एक लहानशी झोपडी आहे. आपण जर तिथेच जाऊन तळ देण्याचे मनात आणाल तर नामी होईल.''

''अलबत! काय हरकत आहे? चल तू पुढें हो.''

अजून एक गोष्ट मात्र नव्हती. वाऱ्याचे अगदी नावदेखील नव्हते. जिकडे तिकडे शांतता सुखराज्य करीत होती असे दिसले. कुठे कुट नाही की फुट नाही. गवतातून टणटण उडणारा किड्यांचा शब्द, किंवा रात्रीच्या किड्यांचा किर्र असा शब्द, काही काहीदेखील कानावर पडत नव्हते. पृथ्वीवरला सगळा वारा अगदी समूळ नाहीसा झाला असे त्या बिचाऱ्यास वाटले. भर मैदानात मोकळ्या जागी असून कोंडमारा झाल्यासारखे त्यांस झाले. काय करतील बिचारे!

तो लठ्ठ सैपाक्या तर आपल्या हातरुमालाने वारा घेत घेत रडक्या सुराने म्हणतो, ''अल्ला, अल्ला, आणखी थोडा वेळ वारा नाही आला तर गुदमरून माझा प्राण खास जाणार!''

''इतका निराश नको होऊ'' नासर म्हणतो, ''थोड्याच वेळात इतका वारा सुरू होईल की त्रेधा उडेल.''

''इन्शाल्ला! ही कर्नाटकातली तुफाने भयंकर!'' एक उंटावरला माणूस म्हणतो.

त्या सैपाक्याने ते सर्व ऐकून व पाहून एक मोठा उसासा टाकला व हं असा शब्द उच्चारला. कुठून या भलत्याच लचांडात येऊन पडलो असं त्यास होऊन गेलं होतं.

इतक्यात एकदम पाण्याचा लोंढा यावा आणि जसा आवाज होतो तसा